८८८४

जावक क्रमांक /२०१७
दिघी पोलीस स्टेशन पुणे
दिनांक ०१/१२/२०१७

प्रति,

मा.जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर

प्रतिवेदक :- खंडेराव खैरे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिघी पोलीस स्टेशन पुणे

विषय :- दाखल गुन्हयातील अनोळखी मयताचे नातेवाईकाचा व अज्ञात आरोपीचा तपास होणेकामी वर्तमानपत्रात प्रसिद्धी होणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की,

१) पोलीस ठाणे - दिघी पोलीस स्टेशन, पुणे.
२) गुन्हा नोंद क्र. - २२९/१७, भा.दं.वि.कलम. ३०२.
३) फिर्यादी - एस.जे.शेंडगे पोलीस उप निरीक्षक दिघी पोलीस स्टेशन पुणे
४) आरोपी - अज्ञात.
५) अ. घ. ता. वेळ - :- दि.३०/११/२०१७ रोजी १८/४५ वा.पूर्वी, राजपर्व सोसायटी चे समोरील रोडचे पूर्वेस असलेले मोकळे पडीक जमीनीत पाय वाटेच्या कडेला वहिलेनगर डूडूळगाव ता. हवेली जि पुणे.
६) अ. दा. ता. वेळ - दि. ०१/१२/२०१७ रोजी ०१.२८ वा.
७) गेला माल - निंरक
८) मयताचे नाव पत्ता - अनोळखी पुरुष वय अंदाजे २० ते २५ वर्षे,नाव पत्ता माहित नाही.

८) **थोडक्यात हकिकत :-** वर नमूद केले तारखेस व वेळी राजपर्व सोसायटी चे समोरील रोडचे पूर्वेस असलेले मोकळे पडीक जमीनीत पाय वाटेच्या कडेला वहिलेनगर डूडूळगाव ता. हवेली जि पुणे येथे असून तेथे एक २० ते २५ वयोगटाचा इसम,अंगाने सडपातळ, उंची अंदाजे ५ फूट ७ इंच,रंगाने काळा सावळा,चेहरा गोल, नाक सरळ, नेसणीस निळसर रंगाचा टी शर्ट, व निळे रंगाची जिन्स पँट, कमरेस लालसर रंगाचा पट्टा, डावे हाताचे मनगटावर मण्यांची माळ, डावे पायाचे घोटयाजवळ काळे दोऱ्यात पांढरी कवडी बांधलेली, तसेच मयताचे अंगावर छातीवर जय जय गुणवंता,उजवे हातावर अमोल व डावे हातावर SARKAR असे इंग्रजीत व डावे दंडावर माँ असे गोंदलेले अशा वर्णनाचे इसमाचा कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणांवरुन डोक्यात दगड मारुन गंभीर जखमी करुन खुन केला आहे म्हणुन भादंवि कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तरी सदर अनोळखी मयताचे नातेवाईकाचा व अज्ञात आरोपीचा तपास हाणेकामी स्थानिक वर्तमान पत्रामध्ये प्रसिद्धी होण्यास विनंती आहे.